# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

क्र : मविनिआ/माअअ/१९/२०१६/१५४३ दि. २५.०२.२०१६

प्रति,
श्री. सुरेश वसंतराव मांदळे,
८३५, सदाशिव पेठ,
पुणे -४११ ०३०.०

**विषय :- आपला दि. २९ जानेवारी, २०१६ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज.**

महोदय,

आपला दि. २९ जानेवारी, २०१६ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. २ फेब्रुवारी, २०१६ रोजी प्राप्त झालेला आहे.

सदर अर्जात आपण उपस्थित केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपणांस आवश्यक असलेल्या माहितीचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.-

| आवश्यक माहितीचा तपशील | खुलासा |
|---|---|
| एम.एस.इ.डी.सी.एल. वाणीज्य परिपत्रक क्र. ११० व १२३ नुसार सर्व सामान्य मीटर एकत्री करण्याबाबत तसेच मीटर एकत्रीकरण करताना कंपनी ग्राहकाकडून मीटर एकत्रीकरण करण्या अगोदरच्या कालावधीचे पैसे वसूल करते. सदर दोन्ही परिपत्रकास आपल्या कार्यालयाच्या मान्यतेच्या आदेशाची छायांकित प्रत साक्षांकित मिळण्यासाठी आपल्या कार्यालयाकडे विनंती अर्ज (पत्र क्र. एम.ई. आर.सी/०१/२०१५ दि. २२.०९.२०१५) आम्ही रजि. पोस्टाने केला आहे. सदर माहिती आम्ही सार्वजनिक जनहितार्थसाठी आपणाकडे मागीतली आहे. एम.एस.इ.डी.सी.एल. या दोन्ही परिपत्रकाच्या आधारे ग्राहकांकडून बेकायदेशीर पैसे वसूल करत आहे. या आमच्या पत्राला आपल्या कार्यालयाकडून आजपावेतो कोणताही लेखी खुलासा प्राप्त झाला नाही. आमच्या या विनंती अर्जाला आपल्या कार्यालयामार्फत लेखी खुलासा न | आपण उल्लेख केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या आदेशाची / परिपत्रकाची छायांकित प्रत या कार्यालयात उपलब्ध नाही.<br><br>आपला अर्ज, महावितरण कंपनीला या कार्यालयाच्या दि. ११.१२.२०१५ रोजीच्या पत्रासोबत आवश्यक कार्यवाहीकरीता पाठविण्यात आलेला आहे (सोबत प्रत जोडली आहे). |

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

| | |
|---|---|
| देण्याबाबतचा महाराष्ट्र शासनाच्या आदेशाची / परिपत्रकाची छायांकित प्रत साक्षांकित मिळावी. | |
| मुख्य अभियंता (वाणिज्य) एम.एस.इ.डी.सी.एल. वाणिज्य परिपत्रक क्र. ११० दि. १६.०२.२०१० व १२३ दि. १४.१०.२०१० या दोन्हीस आपल्या मान्यतेच्या आदेशाची प्रत साक्षांकित मिळावी. | सदर मुद्दा असंबंधीत असल्याने माहिती उपलब्ध करणे शक्य नाही. |

उपरोक्त दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री.अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदीप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

सोबत : वरीलप्रमाणे